# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**

**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.४२४/२०२१/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.देविदास रामचंद्र साळवे<br>रा.मु.पो.शिंदे, नायगांव रोड,<br>ता.जि.नाशिक. | अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., र.सं. व सु. उपविभाग, टी-८,<br>सिटी आर्केड बिल्डींग, जेलरोड,<br>नाशिकरोड ४२२१०१. | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,नाशिक शहर विभाग क्र.२,<br>जुना सायखेडा रोड, हनुमान नगर,<br>जेलरोड, नाशिकरोड ४२२१०१. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**<u>द्वितीय अपिल सुनावणी दि.०९/११/२०२३</u>**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१/१०/२०२० | -- | ०४/११/२०२० | ०२/११/२०२० | -- | २३/१२/२०२० |

अपिलार्थी यांनी दि.०४/०२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "दिलेली माहिती अर्धवट व चुकीची आहे" असे कारण नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०१/१०/२०२० रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "२०१५-२०१६ या कालावधीतील एमएसईबी मार्फत वडझिरे येथे ३३ केव्ही ची जी लाईन टाकण्यात आली त्यासंबंधात एकूण ५ मुद्दयांची" इ. माहिती मागितली आहे.

४. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि.०४/११/२०२० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थी यांना कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३/१२/२०२० रोजी उपलब्ध माहिती अर्जदारास देण्यात आलेली असल्याने अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे आदेश पारित केले आहेत. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधी २०१५-२०१६ असा नमूद केलेला असून विशिष्ट दिनांक नमूद

केलेला नसल्यामुळे माहितीचा अर्ज मोघम ठरतो. आजच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे काय माहिती अर्धवट व चुकीची दिली याबाबत कोणताही उलगडा झाला नाही. याप्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून आयोग सदर कार्यवाहीशी सहमत आहे.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.४२४/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. ओ-६६० , दिनांक :- 28 MAR 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक